# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक – 12.02.2024 वार – सोमवार

---

विविध भारती पुणे, सविता म्हसकर सादर करत आहे, पुणे वृत्तांत...

**नारायण राणे**

केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये नव्याने भरती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दूरस्थ माध्यमातून नियुक्तीपत्रांचं वितरण केलं. देशभरात 47 ठिकाणी हा रोजगार मेळावा झाला. पुण्याजवळील तळेगाव इथल्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या केंद्रावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या रोजगार मेळाव्यात 191 जणांना सरकारी नोकरीची नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली. नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे आणि शिस्तबध्द पद्धतीने, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून; विकसित भारताच्या उभारणीत योगदान द्यावं असं आवाहन राणे यांनी यावेळी केलं. सरकारी किंवा खासगी नोकरीबरोबरच तरुणांनी आणि विशेषतः महिलांनी उद्योग व्यवसायही करावेत असं राणे म्हणाले. केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांची त्यांनी यावेळी माहिती दिली.

**आयएमए**

इंडियन मेडीकल असोसिएशन म्हणजेच आयएमए महाराष्ट्र शाखेची नियमावली; 70 वर्षांनी नूतनीकृत करण्याला पुणे विभागाचे धर्मादाय उपायुक्त राहुल मामू यांनी मान्यता दिली. आयएमएच्या घटनेनुसार गेल्या वर्षी निवडणूक पार पडली. त्यानुसार नवीन कार्यकारणी अस्तिवात आली आहे. अध्यक्षपदी पुण्याचे डॉ. रवींद्र कुंटे यांची निवड करण्यात आली.

**आबा बागूल**

पुणेकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्यासाठी विकास आराखड्याची संपूर्ण अंमलबजावणी करण्याची मागणी माजी उपमहापौर आबा बागुल यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. जोपर्यंत रस्तारुंदी होत नाही तोपर्यंत वाढीव एफएसआय देऊ नये; अस्तित्वातील रस्त्यांनुसारच बांधकाम परवानगी द्यावी; त्यामुळे रस्तारुंदी होण्याआधी जो वाहनांचा अतिरिक्त भार पडत आहे, तो पडणार नाही याकडे बागुल यांनी लक्ष वेधलं.

**परिषद**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नोंदणीकृत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना रुग्णालयीन कायद्याची माहिती देण्यासाठी एका परिषदेचं आयोजन नुकतंच करण्यात आलं होतं. सध्या महापालिकेकडे 617 रुग्णालयं आणि 1 हजार 456 दवाखान्यांची नोंद केलेली आहे.

**जेएनवन**

कोरोनाच्या जे एन वन या उपप्रकारच्या रुग्णांची राज्यातली संख्या आता 661 वर पोहोचली आहे. त्यातील सर्वाधिक 331 रुग्ण पुण्यात आढळले आहेत. सर्वच कोविड रुग्णांचं सरसकट जनुकीय क्रमनिर्धारण करण्याची आवश्यकता नाही; त्याऐवजी रुग्णालयात दाखल कोरोना रुग्णांचंच जनुकीय क्रमनिर्धारण करावं असं राज्य समन्वयक डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी सांगितलं.

**धनगरमेळावा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी दाखवलेल्या मार्गावरच पंतप्रधान नरेंद्र मोदी वाटचाल करत असून 'सब का साथ सब का विकास' या मंत्रानुसार सर्व समाज घटकांचा विकास ते करत आहेत, असं प्रतिपादन भाजपाचे नेते सुनील देवधर यांनी आज पुण्यात केलं. धनगर समाज बांधवांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी पुण्यात आयोजित 'सकल धनगर समाज' मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

**पुरस्कार**

कलारंग प्रतिष्ठान आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीनं यंदाचा आशा भोसले पुरस्कार प्रसिद्ध पार्श्वगायक शान यांना काल प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरण झालं. प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या नावाने मिळणारा पुरस्कार हा माझ्यासाठी खूप मोठा आहे; अशी भावना शान यांनी व्यक्त केली.

**वन विभाग**

पुणे जिल्ह्यातील गवताळ प्रदेशात आढळणाऱ्या लांडग्यासारख्या दुर्मिळ प्राण्यांचं  दैनंदिन जीवनमान समजून घेण्यासाठी वन विभाग कॅमेरे बसवणार आहे. जिल्ह्याच्या गवताळ भागात तरस आणि लांडगे यासारखे प्राणी पूर्वी मोठ्या संख्येनं आढळून येत होते, मात्र त्यांची संख्या आता दुर्मिळ होत चालली आहे. प्राण्यांची ही प्रजाती नामशेष होण्यापासून वाचवण्यासाठी वन विभाग विविध उपाय योजना करत आहे.

**श्रद्धांजली**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार वल्लभ बेनके यांचं काल निधन झालं; त्यांच्या निधनानं पुणे जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, सहकार क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**क्रीडा-सीमा-माधवी**

खेलो इंडियाच्या विद्यापीठ आणि विद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये खेळल्या जाणाऱ्या गतका या भारतीय पारंपरिक खेळाच्या राज्यस्तरीय स्पर्धेचं पुण्यात नुकतंच आयोजन करण्यात आलं होतं. यात राज्यातील 17 जिल्ह्यांतून 170स्पर्धकांनी सहभाग घेतला. यात पुणे शहर संघाने प्रथम,कल्याण-डोंबिवली संघाने द्वितीय तर, कोल्हापूर संघाने त्रितीय क्रमांक पटकावला. मुलांमध्ये स्मित चौधरी, आणि मंथन पवार, तर मुलींमध्ये वर्तिका पाटील या पुण्यातील खेळाडूंना सर्वोत्कृष्ट स्पर्धकांचा मान मिळाला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 34 अंश सेल्सियस होतं; उद्या कमाल तापमानात आणखी थोडी वाढ होईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**